# लो. टिळक यांचे चरित्र

## उत्तरार्ध – खंड २

**(सन १८९९ पासून १९१४ पर्यंत)**

**नरसिंह चिंतामण केळकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८–ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**लो. टिळक यांचे चरित्र (उत्तरार्ध- खंड २) : नरसिंह चिंतामण केळकर**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

**आवृत्ती**
ऑक्टोबर, २०१२

**किंमत**
रुपये ५००/-

---

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

---

# लो. टिळक यांचे चरित्र

लो. टिळक यांचे चरित्र
लो. टिळक यांचे चरित्र

उत्तरार्ध – खंड २

# प्रस्तावना

संकल्पाप्रमाणे टिळकचरित्राचा ग्रंथ आज संपूर्ण होऊन हातावेगळा करिता येत आहे याविषयी आनंद होतो.

या ग्रंथाचा पूर्वार्ध १९२३ च्या एप्रिलात लिहून झाला. त्यानंतर हा उत्तरार्ध लिहिण्याला हाती घेण्यास जवळ जवळ पाच वर्षे लागली. इतका विलंब लागण्याची कारणे वाचकाना सांगितल्याशिवायहि ध्यानात येण्यासारखीच आहेत. अर्थात् असली कारणे केव्हाहि संपत नसतात. तथापि हाती घेतलेले हे काम अर्धेच राहिले तर ते मुळी न केल्यासारखेच झाले असे नेहमी वाटे. ग्रंथ पुरा करण्याकरता जमवून ठेवलेली साधनसामुग्री रोज दृष्टीला पडून आपला परामर्ष न घेतल्याबद्दल निषेध करीत होती. वाचकवर्गाहि दरवर्षी टिळकांच्या जन्मतिथीच्या किंवा मृत्युतिथीच्या सुमारास, ग्रंथाची आठवण ठेऊन, खासगी रीतीने व केव्हा वर्तमानपत्रातूनहि, उरलेला ग्रंथखंड वाचावयास लवकर मिळावा अशी अपेक्षा प्रकट करीत होता आणि स्वत:च्या संकल्पाला हे उत्तेजन समजून ग्रंथ पुरा करून लवकरच हाती देईन अशी आश्वासने मीहि त्याना कृतज्ञताबुद्धीने देत होतो. वरील सर्व कारणांकरिता केव्हा तरी निश्चयाने बसून ग्रंथ पुरा करणे हे अनिर्वाह्य झाले होते. छपाईचे काम सुरू करण्याचे मनात आणताच, येथील 'श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स' आणि 'श्रीसमर्थ भारत छापखाना' यांनी ताबडतोब छापण्यास प्रारंभ करण्याची तयारी दाखविली आणि गेल्या दोन महिन्यात इतर कामे बाजूला ठेऊन मोठ्या तत्परतेने हे काम त्यांनी करून दिले म्हणूनच हा ग्रंथ इतक्या लवकर प्रसिद्ध करता आला. चालू जानेवारी महिन्यात असेंब्लीच्या कामावर जाऊन रुजू होण्यापूर्वी, मी पुण्यास असता, हे काम समक्ष उरकले तरच ते पार पडते, एरवी पुढे उन्हाळ्यात छपाई वगैरे संपवून ता. १ ऑगस्टच्या पूर्वी कबूल केल्याप्रमाणे वाचकांच्या हाती पुस्तक देणे अशक्य होणार असे मला अनुभवाने आढळून आले होते. कसेहि असो. घाईत घाई करून का होईना ग्रंथ पुरा करण्याचा संकल्प तडीस गेला आणि टिळकांच्या येत्या पुण्यतिथीच्या आधीच पाच महिने तो वाचकांचे हाती देता आला याबद्दल वरील दोन्ही छापखान्यांच्या चालकांचे आम्ही अत्यंत आभारी आहो. तसेच कोकाटे बंधु यानी पुस्तके त्वरित बांधून देण्याची मदत केली. या ग्रंथाची साधनसामुग्री पुष्कळ दिवसापासून

काळजीपूर्वक व आस्थेवाईकपणे वेळोवेळी जमवून ठेवणे, ग्रंथ लिहून होत असता ती वेळच्यावेळी लागेल तशी पुरविणे आणि संदर्भ उतारे अवतरणे वगैरे काढून देणे इत्यादि गोष्टींचे सहाय्य चिरंजीव काशिनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर याने केले. श्री. पां. वा. गाडगीळ 'वाङ्मय-विशारद' यानी विषयवार इंडेक्स कार्डे तयार केली. श्री. वि. पां. दांडेकर बी. ए. यानी स्वयंसेवक या नात्याने मधूनमधून लेखकाचे काम केले आणि वाईचे इनामदार श्री. बाळासाहेब साठे यानी आक्टोबर महिन्यात काही दिवस पाचगणी येथील आपले घर आम्हाला राहावयास दिल्यामुळे तेथे एकांतवासात बराच मजकूर लिहून झाला. या कारणांकरिता मी वरील सर्वांचा फार आभारी आहे.

या ग्रंथाचा पूर्वार्ध व हल्लीचा हा उत्तरार्ध यांच्या स्वरूपात मुख्य फरक काय आहे हे वाचकाना न सांगताहि लक्षात येण्यासारखे आहे. या उत्तरार्धात वर्णन केलेला टिळकांच्या कारकीर्दीचा दुसरा भाग तुलनात्मक दृष्टीने अर्थात् बराच अधिक महत्त्वाचा होय. चरित्रलेखकाच्या दृष्टीने सांगण्यासारखा फरक हा की या भागाच्या संबंधांत चरित्रलेखनाची साधने अधिक उपलब्ध झाली. विशेषत: या उत्तरार्धात सुमारे साडेचारशे पत्रे छापता आली. अस्सल पत्रांची मौज ही असते की ती अधिक विश्वसनीय तर असतातच, परंतु पत्र-लेखनाच्या काळात परिस्थितीवर अनेक बाजूंनी प्रकाश पाडणारीहि असतात.

श्री. स. वि. बापट यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या पुस्तकाच्या दोन भागांचाहि उपयोग थोडथोडा झाला. या ग्रंथाचा तिसराहि भाग येत्या ऑगस्टमध्ये प्रसिद्ध होणार आहे व या तीनहि भागांच्या सहाय्याने आणखी एका वेगळ्या रीतीने टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला ते साधन उपयोगी पडण्यासारखे आहे. थोर लोकांची चरित्रे अनेक प्रकारानी लिहिली जाऊ शकतात. मी लिहिले ते मुख्यत: घडलेला इतिहास संगतवार सांगण्याच्या दृष्टीनेच लिहिले आहे.

हल्लीच्या या ग्रंथात अनुच्चारित अनुस्वार न लिहिण्याची नवी पद्धति मी स्वीकारिली आहे. तसेच प्रत्येक भागाच्या शेवटी पृष्ठसंख्या पुरी करून पुन: नव्या भागाला नवा क्रमांक सुरू केला आहे. या दोन्ही सुधारणा सकारण आहेत याहून त्यांचे अधिक समर्थन येथे करीत नाही.

मकरसंक्रांत शके १८४९
पुणे १० जानेवारी १९२८ **न. चिं. केळकर**

# *ग्रंथरचनेची समजूत*

या चरित्राचा पूर्वार्ध १९२३ साली प्रसिद्ध झाला. त्यात सन १८९९ सालापर्यंतची हकीकत दिलेली आहे. त्याला 'खंड पहिला' असे नाव दिलेले आहे. त्यात एकंदर २८ भाग आहेत.

हल्लीचा ग्रंथ त्याच चरित्रग्रंथाचा पुढील व उरलेला संपूर्ण अंश असून त्याला उत्तरार्ध असे नाव दिलेले आहे. सोयीकरिता या उत्तरार्धाचेहि दोन विभाग करून पूर्वीचा क्रम पुढे चालू ठेवला आहे. पैकी पहिल्याला 'उत्तरार्ध खंड दोन' व दुसऱ्याला 'उत्तरार्ध खंड तीन' अशी नावे दिली आहेत. या 'उत्तरार्ध खंड दोन' मध्ये एक ते नऊ भाग आहेत. 'उत्तरार्ध खंड तीन' यामध्येहि एक ते नऊ इतके भाग आहेत.

या उत्तरार्धातील खंड २ व खंड ३ यातील भागाना अनुक्रमांक त्या पुरतेच दिलेले असून शिवाय प्रत्येक भागापुरती पानांची संख्याहि स्वतंत्र देऊन पुरी केली आहे.

पूर्वार्ध – खंड १ भाग २८ आहेत.

उत्तरार्ध – खंड २ भाग ९ आहेत.

उत्तरार्ध – खंड ३ भाग ९ आहेत.

## उत्तरार्ध – खंड २ ची

## अनुक्रमणिका


- भाग १ (सन १८९९ ते १९००) ........ ११
- भाग २ (सन १९०१ ते १९०३) ........ ६९
- भाग ३ (ताईमहाराज प्रकरण) ........ १०९
- भाग ४ (सन १९०४ ते १९०६) ........ १९१
- भाग ५ (सन १९०७) ........ २७९
- भाग ६ (सन १९०७ – सुरतेची राष्ट्रीय सभा) ........ ३३९
- भाग ७ (सन १९०८ सालातील हकीकत) ........ ३७३
- भाग ८ (सन १९०८ – राजद्रोहाचा दुसरा खटला) ........ ४१९
- भाग ९ (मंडाले येथील तुरुंगवास) ........ ४८५


✦✦✦